सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

# शून्याचा महिमा

'शून्य' ही प्राचीन हिंदुस्थानने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. शून्याच्या निर्मितीमुळे अनेक गणिती प्रमेये आणि समस्या सोडविणे गणितज्ञांना शक्य झाले. गणितातल्या या शून्याच्या काही गमतीजमती आहेत. जेव्हा आपण एखादी संख्या शून्य आहे असे म्हणतो तेव्हा तिथे काहीच नाही असे नसते, पण जे काही असते ते अनाकलनीय असते! शून्यातून शून्य काढले तरी शून्य परत उरतेच, म्हणजे हे शून्य परिपूर्ण आहे, संतृप्त आहे. तसेच कोणत्याही संख्येला शून्याने गुणले किंवा भागले तर उत्तर शून्यच येते किंवा जे काही उत्तर येते ते नेमके सांगता येत नाही. शून्याचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही संख्येत जेव्हा शून्य येते तेव्हा त्याचे नेमके स्थान कोणते याला फार महत्त्व असतं. जेव्हा संख्येच्या डाव्या बाजूला हे शून्य येते (उदाहरणार्थ ०१) तेव्हा मूळ संख्येच्या मूल्यात कोणताही बदल होत नाही, पण हेच शून्य जर संख्येच्या उजव्या बाजूला ठेवले (उदाहरणार्थ १०) तर त्या संख्येच्या मूल्यात दसपट वाढ होते आणि त्यानंतर जेवढे शून्य आपण उजव्या स्थानावर वाढवत जाऊ तेवढी ती संख्या अनेक पटींनी मोठी होत जाते. त्यामुळे गणितात एक सूत्र आहे, 'Zero tends to infinity' अर्थात शून्यात असंख्य राहतात! सारांशाने शून्य स्वत: काही नसतानासुद्धा अनेक करामती दाखविण्याचे सामर्थ्य बाळगून असते.

ईश्वरीय शक्तीसुद्धा गणितातल्या या शून्यासारखी प्रचंड ताकदवान आहे, शक्तिमान आहे, परिपूर्ण आहे. ईशावास्य आणि बृहदारण्य उपनिषदात म्हटलं आहे. 'पूर्णमद: पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।' याचा अर्थ असा आहे की पूर्णातून पूर्ण काढले तरी पूर्णच शिल्लक उरते. हे ईश्वरीय सामर्थ्याचे वर्णन आहे. ईश्वर पूर्ण असल्याने त्याच्याकडे अगणित पटीत देण्याचे सामर्थ्य आहे, पण घ्यायचे किती हे घेणाऱ्याच्या कुवतीवर अवलंबून आहे. ईश्वरी अनुग्रह झाल्यानंतर त्या भक्ताची किंमत किती वाढेल हे त्या भक्तावरच अवलंबून असते कारण कमतरतेचा दोष ईश्वराकडे नाही. शून्याच्या गणितीय करामतीचा दाखला द्यायचा झाला तर भक्त स्वत: आपल्या तपसाधनेद्वारे जर एकाचा शंभर (१००) बनला नाही तर ईश्वर त्याला हजार (१०००) बनवू शकणार नाही आणि भक्ताने जर स्वत:चा 'मी' जपत एकच (१) राहण्याचे ठरविले तर कितीही साधना करून ईश्वर त्याला फक्त दहाच (१०) बनवू शकेल. पूर्ण असणाऱ्या, कधीही क्षीण न होणाऱ्या या अमर्याद ईश्वरी सामर्थ्याचा अनुभव पूर्णांशाने घ्यायचा असेल तर संपूर्ण शून्यत्व स्वीकारण्याची तयारी हवी!

हिंदुस्थानी अध्यात्मात दोन कल्पना सांगितल्या आहेत. 'अणोरणीयान्' आणि 'महतो महियान्' - द्रष्ट्याची दृष्टी जेवढी संकुचित, तेवढंच त्याच्यासाठी दृश्य मोठं असतं, त्याच्या आवाक्यात ते सहजपणे येत नाही. याचाच उलट अर्थ असा की आपण आपलं मन आणि बुद्धी जेवढी विशाल करत जाऊ, तेवढे हे विश्व लहान लहान होत जाईल. महाविष्णूच्या वामन अवताराचं हेच रहस्य आहे. छोटं रूप घेऊन तो बळीराजाकडे गेला आणि त्याने भिक्षा मागितली. तोपर्यंत तो अणोरणीयान् होता, म्हणजेच बळीराजाच्या दृष्टीने अगदीच क्षुल्लक होता. ॐ भवति भिक्षां देहि! असे म्हटल्यावर प्रत्यक्ष भिक्षा स्वीकारायची वेळ आली तेव्हा त्याने एवढे विशाल रूप धारण केले की त्यात स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ असे तिन्ही लोक व्यापले गेले, म्हणजेच तो महतो महियान् झाला, अतिविशाल झाला. तेच त्याचं खरं वैश्विक रूप होतं. 'विश्वमूर्तीचं' रूप होतं. अतिलहान झाल्यानंतर येणारा अतिमहानतेचा अनुभव तुकाराम महाराजांनीसुद्धा मोजक्या शब्दांत व्यक्त केला आहे, अणुरेणिया थोकडा, तुका आकाशाएवढा!

जेव्हा जीव आपल्या जीवत्वाचा अहंकार शून्यत्वाला आणतो तेव्हा सुखाच्या सगळ्या अपेक्षा आणि त्यासाठी त्याचे आयुष्यभर चाललेले व्यवहार, त्याला क्षुल्लक वाटू लागतात. मग तो सत्संकल्पाची कास धरून मनाला विकल्प शून्य करतो आणि तेव्हाच त्याच्यातला 'मी'पणा विश्वाला गवसणी घालू शकणाऱ्या विश्वात्मक देवा एवढा मोठा होतो, भव्य होतो. शून्यत्व आणि भव्यत्व या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शून्यत्व साधल्याशिवाय भव्यत्व प्राप्त होत नाही आणि भव्य झाल्याशिवाय मनुष्य पूर्णत्वालाही जाऊ शकत नाही. हाच शून्याचा आध्यात्मिक क्षेत्रातला महिमा!

वासुदेव वामन बापट गुरुजी, ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, खोपोली आणि बदलापूर स्थानांवर गुरुपदी विराजमान आहेत.

- बापट गुरुजी

संपर्क : bhende@indiatimes.com